# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

०७ में, २०२०



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


**मणिकगड (गडचांदुर) येथुन ताब्यात घेतलेल्या तिन नागरीकांची नांदेड प्रशासनाकडुन होणार पुढील पडताळणी**

**नांदेड येथील पथक तिनही इसमांना घेवुन रवाना**

दिनांक ०६मे २०२० रोजी रात्री दरम्यान माणिकगड (गडचांदुर) जिल्हा चंद्रपुर येथे नांदेड येथुन आलेल्या तिन नागरीकांना संशयावरुन जिल्हा प्रशासन व पोलीसांचे मदतीने ताब्यात घेतले होते. पोलीस व कोव्हीड १९ नियंत्रण कक्ष प्रशासनाच्या वतीने नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीसांसोबत सपंर्क केला असता चंद्रपुर येथील ताब्यात घेतलेले तिन इसमांचे नांवे ही नांदेड येथुन पसार झालेल्या इसमांसोबत मिळतेजुळते नसल्याची माहीती मिळाली. तरीही पुढील खबरदारी म्हणुन नांदेड येथील पथक हे ॲम्बुलन्ससह चंद्रपुर येथे येवुन, माणिकगड येथुन ताब्यात घेतलेल्या नांदेड येथील तिनही नागरीकांना घेवुन पुढील तपासणी व पडताळणीकामी नांदेड येथे रवाना झाले आहेत.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे की, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच जनतेमध्ये संभ्रम व भिती निर्माण होईल अशाप्रकारे संदेश किंवा माहीती खात्री झाल्याशिवाय सोशल मिडीयावर प्रसारीत करु नये.

————————————————————————————————————